Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

Fabruary-2020

SPECIAL ISSUE-CCVI

## *Progressive Thoughts in Maharashtra and Need of Social Enlightenment of OBCs.*



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Guest Editor:
Dr. Balaji P. Munde
Associate Professor
Jalna College of
social work ,Jalna
Dist-Jalna

B.Aadhar

138

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Scanned with CamScanner

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Multidisciplinary International Research Journal

Peer-Reviewed Indexed

**February - 2020**

**SPECIAL ISSUE - CCVI**

# Progressive Thoughts in Maharashtra and Need of Social Enlightenment of OBCs

**Chief Editor :**
**Dr. Virag.S.Gawande**

**Editor :**
**Dr.Dinesh W.Nichit**
**Principal**

**Guest Editor**
**Dr. Balaji P. Munde**
MSW, SET, NET & Ph.D. (Social Work), PGD & NET (Adult Education)
Jalna College of social work ,Jalna

**Aadhar International Publications**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher



Scanned with CamScanner

**B.Aadhar** International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
Fabruary 2020

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आरक्षणविषयक विचार : एक अभ्यास / दलित सुभाषराव कांबळे | 1 |
| 2 | संत बसवेष्वर, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज आणि त्यांचे समाजप्रबोधन / स्वप्नील रामभाऊ चिकटे /प्रा. किरणकुमार ज. मनुरे | 4 |
| 3 | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य / भालेराव सुधाकर नारायण | 8 |
| 4 | राजर्षी शाहू महाराज महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाज प्रबोधन आणि सामाजिक न्यायाची चळवळ. / प्रा. कांबळे महेश मधुकर | 11 |
| 5 | इतर मागास प्रवर्ग व मंडल आयोगातील शिफारशी एक मूल्यमापन / कविता मुनेश्वर/नरवाडे बालासाहेब रमेशराव | 14 |
| 6 | स्त्रियांच्या विकासात समाज सुधारकांचे योगदान / कु.यमुना चंद्रकांत ढेंबरे | 18 |
| 7 | राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार आणि भूमिका / प्रेरणा दिलीप दीक्षित | 22 |
| 8 | स्त्रीमुक्ती चळवळीची वाटचाल व घरकामगार महिलांचा सामाजिक स्थितीत झालेले परिवर्तन / निर्मला कारभारी वाघ | 26 |
| 9 | समाज सुधारक आणि सामाजिक न्यायाची चळवळ / कविता ज्ञानेश्वर सोनुने | 28 |
| 10 | स्त्री मुक्तीच्या आद्य प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले / डॉ. रामदास वैद्य/किशोर ल.साळवे | 31 |
| 11 | ओबीसींचे प्रश्न आणि जातनिहाय जनगणना / डॉ. बालाजी मुंडे | 33 |
| 12 | सामाजिक क्रांतीचे अग्रदुत महात्मा ज्योतिबा फुले / डॉ. सुधीर ब. गायकवाड | 38 |
| 13 | इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठी मंडल आयोगाची प्रासंगिकता / प्रा. डॉ. श्रीनिवास नरहरी पिलगुलवार | 42 |
| 14 | महात्मा बसवेश्वर : समाज परिवर्तनवादी युगपुरूष / डॉ. मुंढे सविता गंगाधरराव | 51 |
| 15 | संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे समाज प्रबोधन / प्रा.डॉ.संजय श्री. कुंभारे | 55 |
| 16 | संत गाडगेबाबा ची हिंसाबंदी चळवळ / डॉ. संदिप मनोहरराव राऊत | 59 |
| 17 | शाहु महाराजः स्त्री मुक्ततेचे प्रणेते / प्रा. डॉ. नलावडे एस. एम | 65 |
| 18 | महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा उदय / डॉ. राहूल नारायणराव हिवराळे | 69 |
| 19 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे OBC साठीचे कार्य / प्रा.डॉ.प्रवीण कनकुटे. | 73 |
| 20 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे समाजजागृती आणि राष्ट्रजागृती विषयक कार्य / डॉ. प्रकाश तुकाराम शिंदे | 76 |





161

Scanned with CamScanner

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
Fabruary 2020

# इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठी मंडल आयोगाची प्रासंगिकता

प्रा. डॉ. श्रीनिवास नरहरी पिलगुलवार
समाजशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय वरोरा. जि. चंद्रपूर.

प्रस्तावना:

मौर्य साम्राज्य हे प्राचीन जगाच्या इतिहासातील एक प्रमुख साम्राज्य होते. मौर्य वंशाने शासन केलेल्या साम्राज्याचा कालखंड इ.स.पू. ३२१ ते इ.स.पू. १८५ इतका रामजला जातो. चंद्रगुप्त मौर्य हे मौर्य साम्राज्याचे संस्थापक तर साम्राट अशोक हे या साम्राज्यातील सर्वात प्रमुख शासक होते. गंगेच्या खोऱ्यामधील मगध राज्यापासून या साम्राज्याचा उगम झाला होता. हे साम्राज्य इ.स.पू. ३२२ मध्ये चंद्रगुप्त मौर्य यांनी नंद राजवंशाचा पराभव करून स्थापन केले. चंद्रगुप्त नंतर बिंदूसार आणि साम्राट अशोक यांनी मौर्य साम्राज्याचा विस्तार केला. साम्राट अशोक यांच्या मृत्यूनंतर ६० वर्षांनी मौर्य साम्राज्याचा अस्त झाला. इ.स.पू. १८५ मध्ये मौर्य साम्राज्य संपुष्टात आले. मौर्यांच्या काळापर्यंत भारतातील लोकसंख्येने सर्वाधिक असलेल्या मागासवर्गीयांची सामाजिक स्थिती बऱ्यापैकी सन्मानाची आणि प्रतिष्ठेची होती. (विकीपिडीया) " भारतातील मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर भारतातील लोकसंख्येच्या एका मोठ्या भागाला सत्ता, संपत्ती आणि सामाजिक प्रतिष्ठेपासून बेदखल करण्यात आले होते. २००० वर्ष पूर्वीपासून भारतीय समाजातील लोकसंख्येचा सर्वात मोठा हिस्सा अशाच निस्तेज व मागासलेल्या अवस्थेत जीवन जगत होता. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आंदोलनाच्या माध्यमातून अशा मागासलेल्या अवस्थेत जीवन जगणाऱ्या लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम केले. स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर जेंव्हा भारतीय संविधान तयार करण्याची जबाबदारी आली तेंव्हा त्यांनी देशातील मागासलेल्या लोकांच्या संदर्भात संविधानात्मक तरतूदी करण्याचा प्रश्न विचारार्थ आला, तेंव्हा त्यांनी सर्वप्रथम भारतीय संविधानात कलम ३०४ चा समावेश करून 'इतर मागासवर्गीयांच्या, विकासाच्या संदर्भात तरतूद केली. यानंतर त्यांनी कलम ३४१ ची तरतूद अनुसूचीत जातीसाठी आणि कलम ३४२ ची तरतूद अनुसूचीत जमातीसाठी केली. परंतू खेदाची बाब ही आहे की, इतर मागासवर्गीयांच्या सामाजिक व आर्थिकद विकासाच्या संदर्भात घटनात्मक तरतूदी करून सुद्धा सत्तेवर येणाऱ्या सरकारच्या अनास्थेमुळे आणि उदासिनतेमुळे इतम मागासवर्गीय प्रवर्गातील लोक आजही आपल्या अधिकारापासून वंचित आहेत."(माने:२०१३)

भारतात "मागासवर्गीय" लोक ही एक संविधानात्मक संकल्पना आहे. यांना संविधानात 'इतर मागासवर्गीय' O.B.C. असे म्हणतात. यांचा मागासलेपणा निर्धारीत करण्याचा आधार हा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक आहे. इतर मागासवर्गीय प्रवर्गातील लोक आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत. परंतू हेच त्यांच्या मागासलेपणाचा अत्यंत महत्वाचा घटक आहे असे नाही. कारण भारतीय समाजात आर्थिकदृष्ट्या समान असणाऱ्यांना सूद्धा सारखे अधिकार प्राप्त होत नाहीत. उदा. आर्थिकदृष्ट्या संपन्न असणाऱ्या न्हावी समाजातील व्यक्तीला ब्राम्हण जातीतील व्यक्ती बरोबरचे अधिकार प्राप्त होत नाहीत. भारतीय सामाजिक संरचनेमध्ये श्रेष्ठतेचा अधिकार जन्म, जाती आणि वर्ण आहे. यामुळेच जेंव्हापर्यंत भारतात जातीव्यवस्था आहे, तेंव्हापर्यंत मागासलेपणाचा आधार आर्थिक हा न राहता सामाजिकच राहील. आजही भारतीय समाजाचा सर्वात मजबूत अधिकार हा सामाजिक श्रेणी रचना हाच आहे. सामाजिक श्रेणी रचना ही जात आणि वर्णव्यवस्थेपासून तयार झालेली आहे. भारतातील प्रत्येक जात आणि वर्णातील लोकांचा परंपरागत व्यवसाय आहे. मागास जातीतील लोक आजही आपल्या जातीच्या परंपरागत व्यवसायासोबत जुळलेले आहेत. हीच त्यांची समाजातील ओळख आहे. जसे की, गायींचे पालन पोषण करून दूधाचा व्यवसाय करणारा गवळी, लोखंडाचे काम करणारा लोहार, सोन्या चांदीचे काम करणारा सोनार, शेतीचे काम करणारा कूणबी, केस कर्तन करणारा न्हावी, तेल विकणारा तेली, मातीचे भांडे

बनविणारा कुंभार, कपडे विणणारा विणकर इ. सर्व व्यवसाय करणाऱ्या लोकांचा समावेश इतर मागासवर्गीय लोकांमध्ये होतो. "(ठाकूर:२००९:१५४,१५५)

भारतातील एकूण लोकसंख्येपैकी सर्वाधिक मोठा हिस्सा हा इतर मागासवर्गीय जातींचा आहे. इतर मागासवर्ग हा सामाजिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या जातींचा प्रवर्ग आहे. भारतात बहूसंख्य समाज हा आजही मागासलेल्या अवस्थेत जीवन जगत आहे. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या पूढारलेल्या समाजाची लोकसंख्या देशात अत्यल्प प्रमाणात आहे. बहूसंख्य मागास समाजापैकी जो अधिक मागास आहे, त्यांचा समावेश अनुसूचित जाती व जमातीमध्ये करण्यात आला आहे. जे मागासलेले आहेत, परंतू अनुसूचित जाती व जमाती पेक्षा कमी मागासलेले आहेत. अशा समाजघटकांना इतर मागास प्रवर्गातील जाती (O.B.C.) ठरविण्यात आलेले आहे. भारतातील ५२ टक्के लोकसंख्या ही ' इतर मागासवर्गीय प्रवर्गातील' लोकांची आहे. भारतातील लोकसंख्येचा जवळपास ५२ टक्के भाग हा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या विकासापासून वंचित आहे. देशातील वेग–वेगळ्या राज्य सरकारांनी आणि तत्कालीन केंद्र सरकारांनी इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठी प्रयत्न केले, परंतू ते त्यांचे प्रयत्न अत्यंत तोकडे होते. सर्वात प्रथम १८८५ मध्ये मद्रास सरकारने राज्यातील दलीत व मागासवर्गीय जातीतील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी 'अनूदान संहिता' निर्माण करून दलित व मागासवर्गीय जातीतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी वित्तीय सहाय्यता प्रदान करण्यात आली. १९२१ मध्ये मद्रास सरकारने राज्य विधान परिषदेत असा निर्णय पारीत केला की, राज्यातील सरकारी नौकरीमध्ये गैर ब्राम्हण जातीतील लोकांना अधिक प्राधान्य दिले जाईल. १९२७ मध्ये पून्हा मद्रास राज्यात इतर मागासवर्गीय जातीतील लोकांना सरकारी नौकरीमध्ये आरक्षण वाढवून देण्यात आले.

इ.स. १९२८ मध्ये मुंबई सरकारने राज्यातील मागास वर्गीय जातींचा शोध घेण्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी विशेष योजनांची निर्मिती करून सरकारकडे शिफारसी सादर करण्यासाठी श्री. एच. बी. स्टार्ट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. १९३० मध्ये या समितीने आपला अहवाल सरकारकडे सुपूर्द केला आणि या अहवालात राज्यातील मागासलेल्या जातींचे तीन प्रवर्गात विभाजन करण्याची शिफारस केली. समितीने मागास जातींचे विभाजन दलित, आदिवासी किंवा जंगलात राहणाऱ्या जमाती आणि इतर मागासवर्गीय असे विभाजन केले. समितीद्वारे सरकारला अशी शिफारस करण्यात आली की, या मागास जातींना सरकारी सेवांमध्ये विशेष सुविधा देण्यात याव्यात. भारतातील इतर मागासवर्गीयांच्या समस्यांच्या अध्ययनासाठी भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात दोन स्वतंत्र आयोग निर्माण केले. १९५३ मध्ये काका कालेलकर आयोग निर्माण करण्यात आला. कालेलकर आयोगांनी देशातील इतर मागासवर्गीय जातींची संख्या २३९९ इतकी सांगीतली. त्यात महाराष्ट्रात O.B.C. प्रवर्गातील जातींची संख्या २७२ एवढी सांगीतली. भारत सरकारने पून्हा १ जानेवारी १९७९ ला बी.पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली इतर मागासवर्गीयांच्या अध्ययनासाठी मंडल आयोगाची निर्मिती केली. मंडल आयोगाने देशातील इतर मागास प्रवर्गातील जातींची संख्या ३७४४ इतकी सांगीतली व त्यात महाराष्ट्रातील O.B.C. ची संख्या ३६० एवढी आहे असे स्पष्ट केले. देशातील इतर मागासवर्गीयांच्या समस्यांचा सर्वांगीन अभ्यास हा मंडल आयोगानी केला आहे. परंतू मंडल आयोगाच्या केवळ मोजक्याच शिफारसी केंद्र सरकारने स्वीकारल्या आहेत. त्यामुळे आजही इतर मागासवर्गीयांच्या समस्या कायम आहेत. जर सरकारनी मंडल आयोगाच्या इतर शिफारसींची योग्यपणे अमंलबजावणी केली असती तर इतर मागासवर्गीय जातींचे सामाजिक चित्र हे वेगळे राहिले असते. म्हणून प्रस्तूत शोध निबंधात इतर मागास वर्गीयांच्या विकासासाठी मंडल आयोगाची प्रासंगीकता या विषयावर संशोधनाद्वारे चर्चा करण्यात आली आहे.

**साहित्य परिक्षण:**

**१) प्रा. सुरेश माने (२०१३):**

प्रा. सुरेश माने यांच्या द्वारा लिखित 'मंडल आयोग आणि इतर मागासवर्गीय' हे पुस्तक बहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर यांच्या द्वारे २०१३ मध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. प्रा. माने यांनी प्रस्तूत ग्रंथात मंडल आयोग आणि इतर मागास वर्गीय, मंडल आयोग निर्मितीचे मुळ, मंडल आयोगाच्या अध्ययनासाठी निश्चित करण्यात आलेले विषय, इतर मागासवर्गीयांचे मागासलेपणाचे निर्देशित घटक व मापदंड कोणते, मंडल आयोगाच्या शिफारसी, मंडल



Scanned with CamScanner

आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी व त्याबद्दल देशातील नामवंत वकिलांनी व्यक्त केलेली मते इ. ची सविस्तर चर्चा आपल्या ग्रंथात केली आहे.

२) डॉ. हरिनारायण ठाकूर (२००९):

डॉ. ठाकूर यांनी 'भारत में पिछडा वर्ग आंदोलन और परिवर्तन का नया समाजशास्त्र' नावाचा ग्रंथ २००९ मध्ये कल्पझ पब्लिकेशन्स, नई दिल्ली यांच्या मार्फत प्रकाशित करण्यात आला आहे. डॉ. ठाकूर यांनी आपल्या ग्रंथात हडप्पा संस्कृती, मूल निवासी आणि अनार्य किंवा शुद्रांची संस्कृती, वैदिक सभ्यता, भारतीय वर्ण व्यवस्था आणि इतर मागासवर्गीय ,मध्यकाळात भारतातील इतर मागासवर्गीयांची स्थिती, आधूनिक काळातील इतर मागासवर्गीयांची सामाजिक स्थिती, आधूनिक भारतातील इतर मागासवर्गीय लोकांनी आपल्या न्याय मागण्यांसाठी केलेली वेग–वेगळी आंदोलने याची चर्चा आपल्या ग्रंथात केली आहे. डॉ. ठाकूर यांनी महाराष्ट्रातील पंजाबराव देशमूख यांचे आंदोलन, बिहार मधील कर्पूरी ठाकूर यांचे आंदोलन, त्यागमुर्ती राम लखन चंदापूरी यांचे इतर मागासवर्गीयांचे आंदोलन, इतर मागासवर्गीय आंदोलन आणि काँग्रेस, भारतीय राजकारणात इतर मागासवर्गीय इ. विषयावर विस्तृत चर्चा आपल्या ग्रथांत केली आहे.

३) डॉ. रजनीश कौशिक (२०१०):

डॉ. रजनीश कौशिक यांनी 'आरक्षण व्यवस्था–समस्या या समाधान' नावाचा ग्रंथ २०१० मध्ये राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली मार्फत प्रकाशित केला. डॉ. कौशिक यांनी प्रस्तूत ग्रंथात आरक्षणाची संकल्पना, आरक्षणाची नीती स्विकारण्याची कारणे, आरक्षण आणि इतर मागासवर्गीय, भारतातील आरक्षणाचे धोरण आणि त्याचा भारतात झालेला विकास आरक्षणाच्या भारतातील संविधानात करण्यात आलेल्या तरतूदी, इतर मागास वर्गीयांचे आरक्षण, इ. संदर्भात विस्तृत चर्चा आपल्या ग्रंथात केली. डॉ. कौशिक यांनी भारतातील आरक्षणाचा आधार काय आसावा या बद्दल वेग–वेगळया अभ्यासकांनी मांडलेले दृष्टीकोन याचीही चर्चा आपल्या ग्रंथात कंली आहे.

४) श्री. बी. पी. मंडल (१९८०) :

श्री. बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली १ जानेवारी १९७९ ला तत्कालीन सरकारने इतर मागास वर्गीयांच्या अध्ययनासाठी 'मंडल आयोगाची' निर्मिती केली. त्या आयोगाचा अहवाल 'पिछडा वर्ग आयोग की रिपोर्ट–(भाग एक–खण्ड I और II)' नावाने १९८० मध्ये भारत सरकार नई दिल्ली यांच्या मार्फत प्रकाशित करण्यात आला. प्रस्तूत त्या अहवालाचे साहित्य परिक्षण शोध निबंधाच्या अध्ययनासाठी करण्यात आले आहे. मंडल कमिशन रिपोर्ट मध्ये आयोगाचे गठन व त्यांच्या विचारार्थ विषय; आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांची भूमिका, १९५३ मध्ये भारत सरकार द्वारा इतर मागासवर्गीयांच्या अध्ययनासाठी निर्माण करण्यात आलेल्रा काका कालेलकर आयोग, वेग–वेगळया राज्यांमधील इतर मागासवर्गीयांची स्थिती, सामाजिक मागासलेपण आणि जाती, सामाजिक न्याय योग्यता आणि विशेषाधिकार, मंडल कमिशननी जनतेच्या घेतलेल्या साक्ष, सामाजिक–शैक्षणिक क्षेत्र सर्वेक्षण आणि मागासलेपणाचे मानदंड, इतर मागासवर्गीयांची ओळख, मंडल कमिशनच्या शिफारशी आणि मंडल कमिशनच्या अहवालाचा सारांश इ. घटकांच्या संदर्भात या अहवालात विस्तृत चर्चा करण्यात आली आहे.

अभ्यासाचे महत्वः

भारतात एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ५२टक्के लोकसंख्या ही इतर मागासवर्गीय लोकांची आहे. लोकसंख्येचा सर्वात मोठा भाग हा आजही सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणाच्या अवस्थेत जीवन व्यतीत करीत आहे. अशा मागासलेल्या समाजाच्या समस्यांची उकल करून त्या समस्यावर तटस्थपणे उपाय योजना करणे ही काळाची गरज आहे. इतर मागासवर्गीय लोकांच्या समस्यांकडे सत्तेवर येणाऱ्या प्रत्येक सरकारांनी जाणून–बूजुन दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीत फारसा बदल झालेला नाही. म्हणून प्रस्तूत अध्ययन हे इतर मागासवर्गीय लोकांच्या समस्यांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी महत्वाचे आहे. इतर मागासवर्गीयांची राष्ट्राच्या विकासातील भूमिका महत्वाची राहील जर त्यांचे मागासलेपण दूर करण्याचा सरकारनी प्रयत्न केला तर, इतर मागासवर्गीयांच्या स्थितीकडे अधिक लक्ष देण्याची गरज ही सत्ताधारी व्यवस्थेला आहे. कारण त्यांच्या सहकार्याशिवाय आणि विकासाशिवाय राष्ट्राचा विकास घडवून येणे शक्य नाही. म्हणून प्रस्तूत अध्ययनाचे महत्व अनन्य साधारण असेच आहे.



Scanned with CamScanner

अध्ययनाचे उद्देश:

१) मंडल आयोगाच्या अहवालाचा अभ्यास करणे.

२) मंडल आयोगांनी इतर मागासवर्गीयांसाठी निर्धारित केलेल्या सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाचे मापदंड जाणून घेणे.

३) मंडल आयोगाच्या अहवालातील शिफारशींची इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठीची प्रासंगिकता जाणून घेणे.

गृहीत कृत्ये:

१) इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठी शासनामार्फत करण्यात आलेले प्रयत्न तोकडे आहेत असे दिसून येते.

२) मंडल आयोगाच्या पूर्ण शिफारशींच्या अमंलबजावणी शिवाय इतर मागासवर्गीयांचा विकास शक्य नाही.

अध्ययन पद्धती:

प्रस्तुत शोध निबंधाच्या अध्ययनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करण्यात आला आहे. "वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा मुख्य उद्देश उपलब्ध तथ्य माहिती व आकडेवारीच्या आधारावर एखादी व्यक्ती, समुह, समाज घटना किंवा कोणताही विषय अथवा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा आहे. या संशोधन आराखडयाचा आधार विश्वसनीय तत्व व वास्तविकता हा असतो. अशा आधारावर तत्व व माहितीचे विश्लेषण केले जाते. या विश्लेषणातून प्राप्त नवीन माहितीचे अर्थनिरूपण केले जाते. अशा प्रक्रियेलाच वर्णनात्मक विश्लेषण असे संबोधले जाते."(कऱ्हाडे:२०११) शोध निबंधाशी संबंधीत तथ्यांच्या संकलनासाठी द्वितीयक तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. अध्ययन विषयाशी निगडीत प्रकाशित–अप्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे इतर संशोधकांचे संशोधन इ. चा आधार घेण्यात आला आहे.

तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन:

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्या काळात भारतात स्वर्गीय पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकार सत्तेत होते. २६ नोव्हेंबर १९४९ ला स्वतंत्र भारताचे संविधान तयार झाले. संविधानाची अमंलबजावणी २६ जानेवारी १९५० ला झाली. भारत प्रजासत्ताक, लोकशाही समाजवादी राष्ट्र बनले. एप्रिल १९५२ मध्ये स्वतंत्र भारताच्या लोकसभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या. त्यात कॉंग्रेस पक्षाला स्पष्ट बहूमत मिळाले व पं. जवाहरलाल नेहरू स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान बनले. नेहरूजींच्या सरकार समोर अनेक समस्यांचा डोंगर उभा होता. देशात भीषण दारिद्र, पराकोटीचे मागासलेपण, निरक्षरता, अंधश्रद्धांचे प्राबल्य इ. अशा अनेक समस्या होत्या. अशा समस्यांपैकीच देशातील लोकसंख्येंनी सर्वाधिक मोठया असलेल्या मागासवर्गीयांच्या समस्यांची उकल केल्या शिवाय देशाच्या विकासाचा रथ पुढे सरकणे शक्य नव्हते. म्हणून स्वर्गीय पं. नेहरूजींच्या सरकारने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४० अंतर्गत राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे २९ जानेवारी १९५३ ला स्वर्गीय काका साहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली देशातील पहिला मागासवर्गीय आयोग गठीत केला. कालेलकर आयोगांनी मागासवर्गीयांचा अभ्यास करून देशातील २३९९ मागास जातींची एक सूची तयार केली. त्यात त्यांनी ८३७ जातींची नोंद सर्वाधिक मागास जाती म्हणून केली. या सर्व जातींच्या लोकांची संख्या २१.५ कोटी निर्धारित केली होती. कालेलकरांनी आपला अहवाल सरकारकडे सुपूर्द केला, परंतू या आयोगाच्या अहवालात मागास जातींच्या सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाच्या संदर्भात स्पष्ट मापदंड निश्चित करण्यात आले नसल्यामुळे तत्कालीन सरकारने या आयोगाच्या शिफारशींची अमंलबजावणी करण्यात आपली विशेष रूची दाखविली नाही. अशा कारणांमूळे मागासवर्गीय जातींसाठीचा पहिला आयोग बासनात गुंडाळण्यात आला.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४० चा दूसऱ्यांदा उपयोग करून तत्कालीन पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांनी २० डिसेंबर १९७८ ला संसदेच्या पटलावर इतर मागासवर्गीयांच्या विकासाच्या संदर्भात दूसऱ्या मागासवर्गीय आयोगाची सरकारद्वारा निर्मिती करण्यासाठी चर्चा घडवून आणली. संसदेत या विषयावर साधक बाधक चर्चा झाल्यानंतर संसदेने इतर मागासवर्गीयांच्या सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठीचा ठराव पारीत केला. १ जानेवारी १९७९ ला तत्कालीन राष्ट्रपती श्री. निलम संजीव रेड्डी यांच्या आदेशाने इतर मागासवर्गीयांच्या समस्यांच्या अध्ययनासाठीचा आयोग गठीत करण्यात आला. या आयोगाचे अध्यक्ष म्हणून संसदेतील सदस्य श्री. बीन्देश्वरी प्रसाद मंडल, सदस्य म्हणून श्री. दिवान मोहन लाल, श्री. आर. आर. भोले, श्री. दिनबंधू साहू आणि श्री. के. सुब्रमण्यम् इ.ची नियूक्ती करण्यात आली.



Scanned with CamScanner

आयोगाचे अध्यक्ष श्री. बी. पी. मंडल असल्यामुळे या आयोगाला "मंडल आयोग" अशा नावाने ओळखले जाते. मंडल आयोगाच्या विचारार्थ आणि अध्ययनासाठी पूढील विषय निर्धारीत करून देण्यात आले होते.

१) भारतीय समाजातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीयांना परिभाषित करण्यासाठी मापदंड तयार करणे.

२) आयोगामार्फत परिभाषित करण्यात आलेल्या सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गीयांसाठी प्रगतीसाठी उपाययोजना तयार करून त्याची शिफारस करणे.

३) इतर मागासवर्गीय समाजातील लोकांचे केंद्र व राज्य सरकारच्या शासकीय सेवामध्ये योग्य प्रमाणात प्रतिनिधीत्व आहे की नाही हे अभ्यासणे. जर प्रतिनिधीत्व योग्य प्रमाणात नसेल तर त्यांच्या शासकीय नौकरीतील आरक्षणाच्या संदर्भात आयोगाने आपले मत नोंदविले.

४) इतर मागासवर्गीयांचा सर्वांगीन अभ्यास करून राष्ट्रपतीला आपला अहवाल शिफारशींसह सुपूर्द करणे इ. घटकांच्या अध्ययनासाठी मंडल आयोगाची निर्मिती करण्यात आली होती. मंडल आयोगाने आपला अहवाल ३१ डिसेंबर १९८० ला तत्कालीन राष्ट्रपती श्री निलम संजीव रेड्डी यांच्याकडे सुपूर्द केला.

२१ मार्च १९७९ ला मंडल आयोगाच्या कामकाजाचे विधीवत उद्‌घाटन तत्कालीन पंतप्रधानाच्या हस्ते करण्यात आले होते. इतर मागासवर्गीयांसाठीचा पहिल्या काका कालेलकर आयोगाच्या शिफारशी सरकारने स्विकारण्यास नकार दिला होता. त्याचे मुळ कारण असे होते की, कालेलकर आयोगानी सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीयांसाठींचे निश्चित मापदंड निर्धारीत केले नव्हते. अशा चूका मंडल आयोगाकडून होऊ नयेत म्हणून या आयोगाने आपली कार्यपद्धती निश्चित केली. आपल्या कामकाजाची रूपरेखा तयार करून आयोगाने आपल्या कामास सुरूवात केली. मंडल आयोगानी दिल्ली विद्यापीठामध्ये मानवशास्त्र विभागाद्वारे मंडल आयोगाच्या संदर्भात दोन दिवसीय चर्चा सत्राचे आयोजन केले. या चर्चा सत्रात आयोगाचे उद्देश, कार्यपद्धती आणि शिक्षणतज्ञांशी चर्चा इ. घटकांवर व्यापक चर्चा करण्यात आली. एप्रिल १९७९ मध्ये मंडल आयोगानी आपल्या अध्ययनासाठी तीन प्रकारच्या प्रश्नावली तयार करून त्या देशातील राज्य सरकार, केंद्र सरकार आणि आम जनतेकडे तथ्यांच्या संकलनासाठी पाठविण्यात आल्या. मंडल आयोगाला सर्व प्रश्नावली मधून १८७२ उत्तरे प्राप्त झाली होती. मंडल आयोगाने भारतातील इतर मागासवर्गीयांच्या अध्ययनासाठी त्यांचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण जाणून घेण्यासाठी देशभर वेग–वेगळया ठिकाणी अभ्यास दौरे केले. अशा अभ्यास दौऱ्यांमध्ये ८४ जिल्हा मुख्यालये, ३७ गावंचे दौरे केले. १७१ औपचारिक बैठकांचे आयोजन आयोगामार्फत केल्या गेले. वेग–वेगळया संघटनांकडून आयोगांनी २६३८ निवेदने स्वीकारली. आयोगाने आपल्या अभ्यास दौऱ्यांमध्ये प्रत्येक राज्याच्या राजधानीमध्ये त्या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री, मंत्री, खासदार, आमदार, वरिष्ठ अधिकारी, सामाजिक संघटना इं. बरोबर उपयोगी विचार–विमर्श करून अध्ययनाशी संबंधीत वस्तूनिष्ठ माहिती संकलित केली.

मंडल आयोगानी देशातील इतर मागासवर्गीयांच्या सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाचे अध्ययन अधिक योग्य रीतीने व्हावे यासाठी त्यांनी इतर मागासवर्गीयांचे सामाजिक व शैक्षणिक सर्वेक्षण करून मागासलेपणाचे मानदंड निर्धारीत केले. इतर मागासवर्गीयांच्या सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचे सर्वेक्षण करण्यासाठी आयोगाने प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. एम. एन. श्रीनिवास यांच्या नेतृत्वात समाजशास्त्रज्ञांची एक समिती तयार करून या समितीमार्फत सर्वेक्षणासाठी ४ प्रकारच्या तालीका तयार करण्यात आल्या होत्या. त्यात शहरी व ग्रामीण भागातील इतर मागासवर्गीय कुटूंबांची माहिती गोळा करण्यासाठी दोन स्वतंत्र तालिका व दूसऱ्या दोन तालिका या ग्रामीण व शहरी भागातील इतर मागासवर्गीयांची माहिती गोळा करण्यासाठी होत्या. 'आयोगाने सुरूवातीला एकूण लोकसंख्येचा १ टक्के भाग म्हणजे ६५ लाख लोकांचे अध्ययन करण्याचा विचार केला होता, परंतू हा अध्ययन नमूना अधिक वाटल्याने तो रद्द करण्यात आला. या ऐवजी आयोगाने देशातील प्रत्येक जिल्हयातील २ गावे आणि जिल्हयांच्या ठिकाणच्या शहरातील सर्व भाग नमूना म्हणून अध्ययनासाठी निवडला. त्या काळातील देशातील ४०६ जिल्हयापैकी ४०५ जिल्हयांचे सर्वेक्षण मंडल आयोगाने केले. ४०५ जिल्हयामधील प्रत्येक जिल्हयातील २ गावे आणि शहरातील सर्व भागांचा अभ्यास करण्यात आला.

**B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal**
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
Fabruary 2020

" मंडल आयोगानी इतर मागासव्रर्गीयांच्या सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाचे मानदंड निर्धारीत करण्यासाठी ११ मानक तयार केले होते. अशा ११ मानकांचे वर्गीकरण सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मानकांमध्ये वर्गीकृत करून अध्ययन करण्यात आले होते."(मंडल आयोग:१९८०:४७) ते मानक खालील प्रमाणे,

१) सामाजिक मागासलेपणाचे मानक:

अ) समाजातील अन्य लोकांद्वारा सामाजिक रूपाने मागास समजल्या जाणाऱ्या जाती.

ब) आपल्या उदरनिर्वाहासाठी शारिरीक श्रमावर पूर्णपणे अवलंबून असणाऱ्या जाती.

क) अशा जाती किंवा वर्ग की ज्यांच्यामध्ये ग्रामीण भागातील २५ टक्के महिला आणि १० टक्के पूरूप हे बालविवाह (१७ वर्षा पेक्षा कमी वय असणारे) करतात. आणि शहरात हेच प्रमाण १० टक्के महिला आणि ५ टक्के पूरूप जर बालविवाह करीत असतील तर असे कुटूंब.

ड) अशा जाती आणि वर्ग ज्यांचे राज्य अनूपाताच्या प्रमाणात २५ टक्के महिला श्रमामध्ये अधिक योगदान देत असतील तर

अशा महिला व पूरूष.

२) शैक्षणिक मागासलेपणाचे मानक:

अ) अशा जाती आणि वर्गातील मुलं ज्यांचे वय ५ ते १५ वर्ष आहे. जे कधीच शाळेत गेले नाहीत. आणि हे प्रमाण राज्य सरासरीच्या कमीत कमी २५ टक्के अधिक असेल तर.

ब) अशा जाती आणि वर्गातील मुलं ज्यांचे वय ५ ते १५ वर्ष आहे. ही मुलं शाळा शिकत असतानाच जर शाळा सोडत असतील आणि त्यांचे हे प्रमाण राज्य सरासरीपेक्षा २५ टक्के अधिक असेल तर.

क) अशा जाती आणि वर्गातील मुलं ज्यांच्यामध्ये १० वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण राज्य सरासरीपेक्षा २५ टक्के कमी

असेल तर.

३) आर्थिक मागासलेपणाचे मानक:

अ) अशा जाती की ज्यांच्या कुटूंबाच्या एकूण संपत्तीची सरासरी ही राज्यातील इतर कुटूंबातील लोकांच्या राज्य सरासरीपेक्षा

२५ टक्के कमी असेल तर.

ब) अशा जातीतील लोक की जे कच्या घरात राहतात याचे प्रमाण राज्य सरासरीपेक्षा २५ टक्के अधिक असेल तर.

क) अशा जातीतील लोक की ज्यांच्यामधील ५० टक्के लोकांना पिण्याचे पाणी अर्ध्या किलो मीटर दूरवरून आणावे लागते.

ड) अशा जाती किंवा वर्गातील लोक जी कर्ज काढून आपल्या गरजा भागवितात. त्यांचे प्रमाण जर राज्य सरासरीपेक्षा २५ टक्के अधिक असेल तर.

वरील सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक वर्गीकरणातील एकूण ११ मानकांना मंडल आयोगाने संख्यात्मक स्वरूपात तथ्य प्रगट करण्यासाठी गुण प्रदान केले होते. त्यात सामाजिक मागासलेपणाच्या प्रत्येक मानकाला ३ गुण, शैक्षणिक मागासलेपणाच्या मानकाला २ गुण आणि आर्थिक मागासलेपणाच्या मानकाला १ गूण निर्धारीत केला. अशा सर्व मानकांच्या गुणांची एकूण बेरीज २२ होते. २२ अंकांपैकी ज्या जातीला ११ अंक (५०टक्के) किंवा त्यापेक्षा अधिक अंक प्राप्त झाले, त्या जातीला **"मागास जाती"** म्हणून संबोधण्यात येऊ लागले. ज्या जातींना २२ अंकांपैकी ११ अंक व त्यापेक्षा कमी अंक प्राप्त झाले अशा जातींचा समावेश **"उन्नत"** जातीय गटात करण्यात आला. यातूनच पूढे O.B.C. प्रवर्गातील जातींमध्ये दोन गट निर्माण झाले ते म्हणजे **"उन्नत जाती गट(Creamy Layer Cast Group)"** आणि **"अउन्नत जाती गट(Non-Creamy Layer Cast Group)"** सामाजिक व शैक्षणिक स्थिती यांचे वर्गीकरण हे उत्पन्न या आधारावर करण्यात आले. भारतातील सर्व जातींचे उपरोक्त सर्वेक्षणाच्या पद्धतीचा उपयोग करून मंडल आयोगाने १९८० मध्ये ३७४४ जातींचा समावेश इतर मागासवर्गीय जाती गटांमध्ये करावा अशी शिफारस केली होती.



Scanned with CamScanner

मंडल आयोगाने २ वर्षाच्या अथक संशोधनात्मक प्रयत्नांच्या आधारावर भारतातील इतर मागासवर्गीय जातींच्या मागासलेपणाचा वस्तूनिष्ठ अभ्यास केला. मंडल कमिशनने आपल्या अहवालात मागासवर्गीयांच्या विकासासाठी ज्या शिफारशी केल्या होत्या त्यातील काही प्रमुख शिफारशींचा आढावा आपल्या अध्ययनात पूढील प्रमाणे घेण्यात आला आहे. मंडल आयोगाने ज्यावेळेस आपला अहवाल सरकारला सुपूर्द केला, त्यावेळेस श्री. बी. पी. मंडल यांनी असे मत व्यक्त केले की,"जर आपल्या देशातील इतर मागासवर्गीय जातीतील लोकांच्या उत्थानासाठी, त्यांच्या दारिद्रय निर्मुलनासाठी आपण प्रयत्न केले नाहीत आणि त्यांना विकासा पासून वंचित ठेवणे म्हणजे आपली सर्वात मोठी चूक ठरेल."

मंडल आयोगानी इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठी पहिली शिफारस 'आरक्षणाची(Reservation)' केली. आयोगाच्या मते इतर मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना सरकारी सेवा तथा शैक्षणिक संस्थामध्ये आरक्षणाच्या व्यवस्थेची तरतूद केली पाहिजे असे मत नोंदविले. आयोगाने पूढे असेही म्हटले आहे की इतर मागासवर्गीय जातीतील लोकांना काही हजार सरकारी नोकऱ्या दिल्या म्हणजे, ५२ टक्के लोकसंख्या असणाऱ्या समाजाच्या सर्वच समस्यांची उकल होईल असे नाही. परंतू देशाच्या स्वातंत्र्यापासून सरकारी नोकरी करणाऱ्या व्यक्तीला समाजात मान, सन्मान आणि प्रतिष्ठा प्राप्त होते. ती प्रतिष्ठा जर इतर मागासवर्गीय लोकांना मिळू लागली तर आपोआपच त्यांच्या मागासलेपणात कमतरता येईल व त्यांमुळे त्यांच्या विकासाला आणि प्रगतीला चालना मिळेल. आयोगाने शासकीय सेवा आणि शैक्षणिक संस्थामध्ये O.B.C. ना २७ टक्के आरक्षणाची तरतूद करावी अशी शिफारस आपल्या अहवालात केली. आयोगाने पूढे असेही म्हटले आहे की खूल्या प्रवर्गातून नियूक्त झालेल्या O.B.C. च्या उमेदवाराला २७ टक्के आरक्षण कोटयात त्यांची गणती करू नये. त्याचबरोबर O.B.C. च्या आरक्षणाची अमंलबजावणी पदोन्नतीतही करण्यात यावी अशी शिफारस आयोगांनी केली. एखादी खाजगी संस्था जर कोणत्याही स्वरूपात सरकारी अनूदान थोडेसे सुद्धा घेत असेल तर अशा खाजगी संस्थामध्ये सुद्धा या आरक्षणाची अमंलबजावणी करण्यात यावी अशी शिफारस आयोगांनी केली.

मंडल आयोगानी इतर मागासवर्गीयांच्या शैक्षणिक विकासासाठी शैक्षणिक आरक्षण व शिक्षणात वेग–वेगळया प्रकारची सूट देण्यात यावी याची शिफारस केली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करणे, शाळेत मुलांना गणवेश व पुस्तकांचे मुफ्त वाटप करणे, वसतीगृह सुविधा, दुपारचे जेवण, प्रौढ शिक्षणाची व्यवस्था, आश्रम शाळांची व्यवस्था, व्यावसायिक प्रशिक्षणाची व्यवस्था इं. ची सुविधा विद्यार्थ्यांना देण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली होती. त्याचबरोबर देशातील वैद्यकीय शिक्षण, तंत्र शिक्षण व व्यवस्थापणाचे शिक्षण देणाऱ्या महत्वपूर्ण संस्थामध्ये O.B.C. च्या विद्यार्थ्यांना आरक्षण देण्यात यावे अशी शिफारस आयोगाने केली. इतर मागासवर्गीय प्रवर्गातील ज्या जातींचा पारंपारीक व्यवसाय आहे अशा जातीय गटातील लोकांना त्यांच्या पारंपारीक व्यवसायात सुधारणा व वृद्धी करण्यासाठी त्यांना दीर्घ मुदतीवर व अल्प व्याजदरावर कर्ज देण्यात यावे अशी शिफारस आयोगाने केली. या बरोबरच आयोगाने इतरही काही शिफारशी केल्या त्यात, मागासवर्गीय लोकांना अर्थ सहाय्य करण्यासाठी वित्तीय महामंडळाची स्थापना करण्यात यावी, O.B.C. प्रवर्गातील तरूण उद्योजक बनावेत यासाठी सरकारने प्रयत्न करावेत, श्रीमंत जातीतील लोकांकडून मागासवर्गीयांच्या होणाऱ्या शोषणाला प्रतिबंध घालण्यात यावा. इतर मागासवर्गीय जातीच्या लोकांच्या शेतीशी संबंधीत समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न सरकार मार्फत करण्यात यावा, इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठी राज्य व केंद्रात वेगळया मंत्रालयाची स्थापना करावी, इतर मागासवर्गीयांची जातीनिहाय गणना करावी, सर्व राज्य सरकारांनी जमीन सुधारणा कायदा करून इतर मागासवर्गीय जातीतील भूमीहीन, शेतमजुर, कारागीर इ. लोकांना शासकीय जमीनींचे वाटप करण्यात यावे. इतर मागासवर्गीय जातीच्या विकासासाठी आवश्यक असतील त्या सर्व उपाय योजना केंद्र व राज्य सरकारांनी मिळून कराव्यात. इ. प्रकाराच्या शिफारशी आपल्या अहवालाच्या माध्यमातून मंडल आयोगानी O.B.C. च्या विकासासाठी केल्या होत्या. मंडल आयोगाने इतर मागासवर्गीयांच्या सर्वांगीन विकासाचे आदर्श प्रारूप आपल्या अहवालातील शिफारशींच्या माध्यमातून निर्माण केल्यामुळे मागासवर्गीयांना मसिहा म्हणून श्री. बीन्देश्वरी प्रसाद मंडल यांना ओळखले जाते. मंडल आयोगाच्या अहवालातील शिफारशी इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठी लागु करण्याचे काम तत्कालीन पंतप्रधान श्री. विश्वनाथ प्रताप सिंह यांना केले. १३ ऑगस्ट १९९० ला भारत सरकारने कार्यालयीन आदेशाद्वारे ही घोषणा केली की, मंडल आयोगाच्या शिफारशीसह केंद्र सरकारने अहवाल स्विकारला व त्याची अमंलबजावणी १३ ऑगस्ट १९९० पासून करण्यात येत आहे. परंतू, नंतरच्या

सरकारांनी मंडल आयोगाच्या शिफारशींना लागु करण्यात कुचराईपणा केल्यामुळे मोजक्याच शिफारशी अमलात येऊ शकल्या. म्हणून O.B.C. च्या विकासासाठी मंडल आयोगाची प्रासंगिकता आहे.

**अध्ययनाचे निष्कर्श:**

१) मंडल आयोगानी मागासवर्गीयांच्या स्थितीचे वस्तुनिष्ठ अध्ययन केले आहे.

२) डॉ. एम. एन. श्रीनिवास यांचे महत्वपूर्ण योगदान आयोगाच्या अहवालात आहे.

३) मंडल आयोगानी ग्रामीण व शहरी भागातील लोकांचा वेग–वेगळा अभ्यास केल्यामुळे वस्तूनिष्ठ तथ्य संकलित करण्यास अधिक चांगली मदत झाली.

४) देशातील सर्व कानाकोपऱ्यातील इतर मागासवर्गीयांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न मंडल आयोगानी केला.

५) मंडल आयोगानी इतर मागासवर्गीयांचे मागासलेपण निर्धारीत करण्यासाठी सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकद स्वरूपाच्या सर्वेक्षणाची ११ मानके तयार केली.

६) मागासलेपणा निर्धारीत करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या ११ मानकांना २२ अंक देऊन संख्यात्मक स्वरूपात तथ्य संकलित केले.

७) ज्या जातीय गटांना सर्वेक्षणात ११ अंक (५०टक्के) किंवा त्यापेक्षा अधिक अंक प्राप्त झाले त्या जातीय गटांना इतर मागासवर्गीय समजण्यात येऊ लागले.

८) मंडल आयोगाने इतर मागासवर्गीय जातींची विभागणी दोन गटांत केली, (१) उन्नत जाती गट(Creamy Layer Cast Group) (२) अउन्नत जाती गट(Non-Creamy Layer Cast Group).

९) मंडल आयोगाने एकूण ३७४४ जातींचा समावेश इतर मागासवर्गीय प्रवर्गात केला.

१०) मंडल आयोगाने आपल्या अहवालात इतर मागासवर्गीयांसाठी शैक्षणिक संस्थामध्ये व शासकीय नोकरीमध्ये २७ टक्के आरक्षणाची शिफारस केली.

११) ५२ टक्के लोकसंख्या असणाऱ्या समाजास २७ टक्के आरक्षण हे सुद्धा तोकडे आहे. परंतू, आरक्षणाची मर्यादा ५० टक्के असल्यामूळे आयोगानी O.B.C. ना २७ टक्के आरक्षणाची शिफारस केली आहे असे मत आयोगानी नोंदविले.

१२) आयोगाने O.B.C. च्या आरक्षणाची अमंलबजावणी पदोन्नतीतही करण्यात यावी अशी शिफारस केली.

१३) सर्वच अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्थामध्ये O.B.C. ना मोफत शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून दयाव्यात अशी शिफारस केली होती.

१४) IIT,IIM अशा महत्वपूर्ण शैक्षणिक संस्थामध्ये O.B.C. ना आरक्षण देण्यात यावे अशी सुचना आयोगाने केली आहे.

१५) सरकारी अनुदान प्राप्त खाजगी संस्थामध्ये O.B.C. च्या आरक्षणाची अमंलबजावणी करावी.

१६) इतर मागासवर्गीय समाजातील पारंपारीक व्यवसाय करणाऱ्या जातींना व्यवसायासाठी अर्थ सहाय्य करण्यात यावे.

१७) O.B.C. ना अर्थ सहाय्य देण्यासाठी आर्थिकद विकास महामंडळाची स्थापना करावी.

१८) इतर मागासवर्गीयांसाठी भूमी सुधार कायदयाची तरतुद मंडल आयोगाने केली.

१९) इतर मागासवर्गीयांसाठी शासनामार्फत करण्यात आलेल्या आजपर्यंतचे प्रयत्न हे तोकडेच आहेत असे मंडल आयोगाच्या अध्ययनावरून दिसून येते.

२०) मंडल आयोगाच्या संपूर्ण शिफारशींची अमंलबजावणी केल्याशिवाय इतर मागासवर्गीयांचा विकास शक्य नाही म्हणून O.B.C. च्या विकासासाठी मंडल आयोगाची प्रासंगिकता आहे.

Scanned with CamScanner

B.Aadhar International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
Fabruary 2020

संदर्भ ग्रंथ:

विकीपिडीया; mr.m.wikipedia.org.

माने,सुरेश.(२०१३).*मंडल आयोग एवं अन्य पिछडा वर्ग*.नागपूर,बहूजन साहित्य प्रसार केंद्र.

ठाकूर,हरिनारायण.(२००९).*भारत में पिछडा वर्ग आंदोलन और परिवर्तन का नया समाजशास्त्र*.दिल्ली, कल्पज पब्लिकेशन्स्.

कौशिक,रजनीश.(२०१०).*आरक्षण व्यवस्था–समस्या या समाधान*. नई दिल्ली, राधा पब्लिकेशन्स्.

कराडे, बी. एम.(२०११).*शास्त्रीय संशोधन पद्धती*.नागपूर, पिंपळापूरे अँन्ड कंपनी पब्लिशर्स्.

मंडल, ब्री. पी.(१९८०).*मंडल आयोग*.नई दिल्ली,भारत सरकार पृ. क्र. ४७.

*कित्ता*, पृ. क्र. ५१.

दत्त,रूद्र.(२००९).*विकास,गरीबी और समता*.नई दिल्ली,रिगल पब्लिकेशन्स्.

महाजन,ध. एवं महाजन क.(२०१३).*भारतीय समाज मुद्दे एवं समस्याए*.दिल्ली,विवेक प्रकाशन.

पाटील,जनार्दन आणि इतर.(१९९०).*मंडल आयोग:ओ.बी.सी. च्या लोकशाही मुक्तीचा जाहीरनामा*.मुंबई, अँड. जनार्दन पाटील.

कश्यप,ए. के. एवं कश्यप, एम. के.(२०१२).*भारतीय समाज मुद्दे एवं समस्याए*.नई दिल्ली, अर्जुन पब्लिकेशन्स्.

Jha,G.M.&at all,(2013). *Mandal Commission: Equality & Liberty*.I.Res.J.Social science.2(6),35-38,Jun(2013).

Scanned with CamScanner